दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ५/२०२६
गौरी वि. कोणी नाही
नि.१० लगत

**अर्जदारतर्फे साक्षीदार क्र.१**
**श्रीमती गौरी महेश राऊळ**
**शपथेवर सुरु**
**पुढील सरतपास अर्जदारतर्फे विधिज्ञ कु. बांदेकर यांचेतर्फे**

७. सदर अर्जात मी माझे सरतपासाचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. सदर अर्जाकामी मी खालील दस्तऐवज दाखल केले आहेत.

१. मी माझे पती महेश वसंत राऊळ यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. ११** देण्यात येत आहे.

२. मी ओमनी गाडी क्र. एमएच०४/इएच-१०८७ चे आर सी. बुकची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. १२** देण्यात येत आहे.

३. मी उपप्रादेशिक परिवहन अधिकारी सिंधुदुर्ग यांनी मला दिलेले दिनांक २१/११/२०२५ चे मुळ पत्र अभिलेखावर दाखल केले आहे. त्यास **नि. १३** देण्यात येत आहे.

४. मी माझे रेशनकार्ड, आधारकार्ड व अर्जदार क्र. २ चे आधारकार्डची मुळ प्रत अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **अनुक्रमे नि. १४ ते १६** देण्यात येत आहे.

५. दिनांक २१/०१/२०२६ रोजी दैनिक 'सकाळ' सिंधुदुर्ग आवृत्ती या वृत्तपत्रात प्रसिध्द केलेली जाहिर नोटीस अभिलेखावर दाखल केली आहे. त्यास **नि. १७** देण्यात येत आहे.

सरतपास पूर्ण.

श्रवणोत्तर स्वीकृत

JAHEDA MOHMED MISTRY
Digitally signed by JAHEDA MOHMED MISTRY
Date: 2026.04.28 17:23:46 +0530

दिनांक -२८/०४/२०२६

(जे. एम. मिस्त्री)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सावंतवाडी.